महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

**सेवायोजन जाहिरात क्र. ०६/२०२३**

**प्रसिध्दीपत्रक**

महावितरण कंपनीमध्ये विद्युत सहाय्यक या संवर्गाची रिक्त पदे भरण्याकरीता जाहिरात क्र. ०६/२०२३ ही दिनांक २९/१२/२०२३ रोजी प्रसिद्ध करण्यात आली होती. विद्युत सहाय्यक पदाची निवड यादी दि. ३०/०७/२०२५ रोजी कंपनीच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली होती.

तद्नंतर निवड झालेल्या उमेदवारांची कागदपत्रे पडताळणी त्यांना वर्ग करण्यात आलेल्या परिमंडळामध्ये करण्यात आली असून पात्र उमेदवारांना नियुक्त्या देण्याची कार्यवाही सुरू आहे. सदर बाबतीत क्षेत्रिय स्तरावरील दिल्या गेलेल्या नियुक्त्या बाबतच्या कार्यवाहीचा आढावा घेऊन अपात्रता व गैरहजेरी याचा विचार करता कंपनीच्या नियमानुसार जाहिरात केलेल्या पदांच्या ५०% मर्यादेपर्यंत प्रतिक्षा यादी सर्वसाधारणपणे माहे-नोव्हेंबर, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात प्रसिद्ध करण्यात येईल. सबब, उमेदवारांनी यासंदर्भात महावितरणच्या अधिकृत संकेतस्थळाचे www.mahadiscom.in वेळोवेळी अवलोकन करावे.

**Sd/-**

**दिनांक :** १७/१०/२०२५

**कार्यकारी संचालक (मासं)**